# नीतिशास्त्र आणि उपयोजित नीतिशास्त्र

नीतिशास्त्रास इंग्रजीत Ethics असे म्हणतात. Ethics या शब्दाचा अर्थ चालीरीती किंवा सवयी असा होतो. नीतिशास्त्रास इंग्रजीत Moral Philosophy (नैतिकतत्त्वज्ञान) असेही म्हणतात. त्याचाही अर्थ रूढी किंवा चालीरीति असा होतो. म्हणून या दोन्ही शब्दांचा शब्दशः अर्थ घेतल्यास नीतिशास्त्र म्हणजे रूढी, सवयी किंवा चालीरीतिंचा अभ्यास करणारे शास्त्र अशी प्राथमिक स्वरूपाची व्याख्या सांगता येते.

याठिकाणी असा प्रश्न निर्माण होतो कि या रूढी, सवयी किंवा चालीरीतिंचे आपल्याला ज्ञान होते कसे? तर याला असे उत्तर आहे की हे ज्ञान आपल्याला आचरणातून होते. म्हणून 'नीतिशास्त्र म्हणजे मानवी आचरणाचा अभ्यास करणारे शास्त्र' अशी ही व्याख्या केली जाते. नीतिशास्त्रात मानवी वर्तनाचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास केला जात नाही. ते कार्य मानसशास्त्र करते. या उलट नीतिशास्त्रात मानवी ~~वर्तनाच्या~~ आचरणाचा ~~वस्तु~~ आदर्शात्मक अभ्यास केला जातो. म्हणजे मानवाचे आचरण कसे असावे हा नीतिशास्त्राचा अभ्यास विषय आहे. नीतिशास्त्रात व्यक्तीच्या वैयक्तिक स्वरूपाच्या आचरणाचा अभ्यास केला जातो.

नीतिशास्त्राची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतात.
1. नीतिशास्त्र हे शास्त्र आहे. (2) नीतिशास्त्र हे आदर्शवादी शास्त्र आहे.
3. नीतिशास्त्र हे व्यावहारिक शास्त्र नाही. (4) नीतिशास्त्र कला नाही.

उपयोजित नीतिशास्त्र ही नीतिशास्त्राची एक शाखा आहे. व्यक्तीच्या सामाजिक स्वरूपाच्या आचरणाचा आदर्शात्मक अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे उपयोजित नीतिशास्त्र. होय. मानवी जीवनाशी निगडीत विविध क्षेत्रातील नैतिक कृतिंची चिकित्सा उपयोजित नीतिशास्त्रात केली जाते. उदा. जैव नीतिशास्त्रात दयामृत्यू किंवा भ्रूणहत्या या अनुषंगाने योग्य नैतिक दृष्टीकोन कोणता? याचा विचार केला जातो. पर्यावरण शास्त्रात मानवाचे इतर सजीवां प्रती असणारे आचरण कसे असावे याचा विचार केला जातो. तर व्यापारीनीतिशास्त्रात व्यापाऱ्याचे ग्राहकांशी किंवा कामगारांप्रती कर्तव्ये कोणती असावीत याचा विचार केला जातो. उपयोजित नीतिशास्त्राचे स्वरूप पारंपारिक आदर्शात्मक नीतिशास्त्रापेक्षा वेगळे आहे. पारंपारिक नीतिशास्त्रात व्यक्तीच्या वैयक्तिक आचरणाचा सार्वकालीक दृष्टीकोनातून विचार केला जातो. याउलट उपयोजित नीतिशास्त्रात व्यक्तीच्या सामाजिक आचरणाचा वर्तमानकालीन संदर्भात अभ्यास केला जातो.

समाज व्यक्तीजीवनाला आकार देणारी संस्था आहे. समाजाशिवाय व्यक्तीच्या अस्तित्वाला अर्थ उरत नाही. जेंव्हा समाज भ्रष्ट होतो, किंवा सामाजिक संस्थांचे आचरण अनैतिक बनू लागते तेंव्हा मानवी जीवन जगणे कठीण असते. अशावेळी सामाजिक आचरण कसे असावे हा विचार उपयोजित नीतिशास्त्रात केला जातो. म्हणून त्याला अनन्यसाधारण महत्व आहे.

# व्यवसाय - व्यापार

व्यवसाय किंवा व्यापार या दोन्ही संस्था प्रामुख्याने समाजात निर्माण होणाऱ्या समस्यांची सोडवणूक करत असतात. तरीही समाजात विविध व्यवसाय आणि ते करणारे व्यावसायिक यांना अधिक महत्त्व आणि प्रतिष्ठा दिली जाते. कोणताही व्यवसाय विशिष्ट कौशल्याच्या सहाय्याने समाजाला सेवा देण्यासाठी केला जातो. सेवा देताना व्यावसायिकास आनंद मिळतो, स्वतःच्या कामाविषयी अभिमान वाटत असतो. आपली सेवा गुणात्मकदृष्ट्या उच्च दर्जाची असावी असा प्रयत्न प्रत्येक व्यावसायिकाचा असतो. व्यावसायिक ज्ञान शास्त्रीय स्वरूपाचे असल्याने त्यापासून समाजास कसलीही हानी पोहचत नाही. प्रत्येक व्यवसाय सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून केला जातो. व्यवसायात व्यावसायिकाचे चारित्र्य, सेवातत्परता, नम्रता, उदारता अशा गोष्टी महत्त्वाच्या असतात. त्यामुळे व्यावसायिकास समाजात एक विशेष असे आदराचे स्थान असते. व्यापार हा समाजाच्या गरजा भागवण्याचे महत्त्वाचे कार्य करत असला तरी वर प्रतिपादन केलेल्या बाबी व्यापारात फारशा पाहिल्या जात नाहीत. त्यामुळे व्यापाऱ्यास समाजात विशेष असे स्थान दिले जात नाही.

व्यवसाय आणि व्यापारातील काही स्थूल भेद पुढीलप्रमाणे दाखवता येतात.

1. अर्थार्जन करणे हा व्यवसाय आणि व्यापाराचा उद्देश असला तरी व्यापाराचा एकमेव उद्देश अर्थार्जन हा असतो. याउलट व्यवसायात अर्थार्जनापेक्षा सेवेला महत्त्व दिले जाते.
2. व्यापाराचा संबंध दृश्य, मूर्त, उपभोग्य वस्तूंशी येतो. त्यांचे मूल्य निश्चित पैशाने चुकवता येते. याउलट व्यवसायाचा संबंध अदृश्य, अमूर्त सेवेशी असतो. त्याचे मूल्य निश्चित पैशाने ठरवता येत नाही.
3. व्यापार प्रामुख्याने वैयक्तिक हिताला प्राधान्य देणारा असतो. तर व्यवसाय हा सामाजिक हिताला प्राधान्य देणारा असतो.
4. व्यापाराचे यश आर्थिक फायद्यावरून ठरवले जाते. याउलट व्यवसायाचे यश सेवेच्या गुणवत्तेवरून ठरवले जाते.
5. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, व्यापारात सामाजिक उत्तरदायित्वाची भावना नसते. मी देखील समाजाचे काही देणे लागतो ही सामाजिक उत्तरदायित्वाची भावना व्यवसायातच असते.